# प्रेसनोट

जा.क्र. ३४०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–२०/०६/२०१६.

## " भंडारा जिल्हा पोलीस कर्मचा–यांसाठी योगा व प्राणायम शिबीर"

**भंडारा :–** जिल्हयातील पोलीस कर्मचा–यांचे दैनंदिन जीवनमान अतिशय ताणतणाव व धकाधकीचे असुन काही कर्मचा–यांना आपल्या कुटुंबीयांपासुन अलिप्त रहावे लागत असल्याने त्यांच्यात नैराश्य वाढत जाते. सदर बाब गंभीर असुन कर्मचा–यांचे ताणतणाव कसे घालवता येईल व सकारात्मक दृष्टया जीवन आनंदाने कसे जगता येईल, या उद्देशाने व आंतरराष्ट्रीय दिनानिमीत्ताने दि. २१ जुन ते २७ जुन पर्यंत योग सप्ताह शिबीर राबविण्यात येणार असुन पोलीस कर्मचा–यांना योगा व प्राणायमाचे धडे दिले जाणार आहे.

पोलीस मुख्यालयाच्या बहुउद्देशि सभागृहामध्ये पोलीस कर्मचा–यांसाठी मंगळवारपासुन ७ दिवसीय योग व प्राणायम शिबीर सुरू करण्यात येणार आहे. यात योग प्रशिक्षक श्री. उमेश राजाभोज (योग प्राकृतीक चिकीस्तक भंडारा) व श्री. कमलेश येनुरकर (मास्टर ट्रेनर आयुष स्प्रांदय भंडारा) हे भंडारा पोलीस जवानांना योग व प्राणायमाचे प्रशिक्षण देणार आहे. पोलीस कर्मचा–यांना नक्षलविरोधी अभियान, कोबिंग ऑपरेशन करावे लागते. शिवाय, काही कर्मचारी आपल्या कुटुंबीयांपासुन दुर राहत असल्याने मानसिक तणावात असतात, हे लक्षात घेवुन त्यांच्यात मानसिक व शारीरिक बदल घडवुन सकारात्मक भावना व जीवन जगण्याची कला अवगत व्हावी म्हणुन योग प्राणायम शिबीर राबविण्यात येणार आहे.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.